**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक,
उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१
www.jdhemumbai.gov.in Tel&Fax No. ०२२ २२६५६६००, २२६९१५२८

क्र.ससं/उशि/मुंवि/आस्था/२०१७/१७५६ दिनांक-२९.८.२०१७

प्रति,

१. कुलगरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई

२. कुलगुरु,एसएनडीटी महिला विद्यापीठ,मुंबई

विषय-कुलगुरु प्रतिनिधी (V.C. NOMINEE)/विषयतज्ज्ञ यांनी निवड समितीवर वेळेवर उपस्थित न राहील्यामुळे निर्माण होणा-या गैरसोयीबाबत..

सदर कार्यालय मुंबई विभागातील विभागीय कार्यालय असून सदर कार्यालयाच्या अधिपत्याखाली मुंबई शहर/उपनगर येथील अनेक शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालये तसेच मुंबई विद्यापीठ,एसएनडीटी महिला विद्यापीठ यांच्या आस्थापना कार्यरत आहेत. त्यामुळे अशासकीय महाविद्यालयात होणा-या सहाय्यक प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक यांच्या कॅस संदर्भात, तसेच प्राचार्य/सहाय्यक प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक यांच्या नियुक्तीबाबत असलेल्या निवड समितीवर या कार्यालयामार्फत शासकीय प्रतिनिधी दिला जातो. त्यांचप्रमाणे मुंबई विद्यापीठ/एसएनडीटी महिला विद्यापीठ यांचेकडून कुलगुरु प्रतिनिधी व विषय तज्ज्ञ दिले जातात. त्यानंतरच संबंधित अशासकीय महाविद्यालयात कॅस संदर्भात व प्राचार्य/प्राध्यापक नियुक्तीच्या निवड समितीची बैठक आयोजित करण्यात येते.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, ज्या दिवशी कॅस संदर्भात अथवा प्राचार्य/प्राध्यापक यांच्या नियुक्ती संदर्भात बैठक आयोजित करण्यात येते त्यावेळी काही कुलगुरु प्रतिनिधी /विषयतज्ज्ञ वेळेवर बैठकीस उपस्थित न राहिल्याने तसेच काहीवेळा अनुपस्थित राहिल्याने बैठक सुरु होण्यास व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास उशिर होतो. परिणामी वेळेचा अपव्यय होतो. ही बाब अतिशय गंभीर आहे. तरी यापुढे आपल्यामार्फत पाठविण्यात येणा-या कुलगुरु प्रतिनिधींना/विषय तज्ज्ञांना निवड समितीवरील बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याविषयी सूचित करावे. तसेच यापुढे कुलगुरु प्रतिनिधी/विषयतज्ज्ञ यांचेकडून अशी दिरंगाई होणार नाही याची विशेष दक्षता आपल्या स्तरावर घ्यावी.

सहसंचालक
उच्च शिक्षण,मुंबई विभाग,मुंबई

प्रत-सर्व अशासकीय महाविद्यालये,मुंबई शहर व मुंबई उपनगर

university